# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**दाखल झालेले अपील**

**क्र. मुमाआ/नों.क्र.२१०४४८/२१/अ.क्र.५९२७/२४/०१**

**श्री. मिलिंद बाळसराफ**
रुम नं.२९, व्हाईट हाऊस, टी.बी.कदम मार्ग,
चिंचपोकळी (पू.), मुंबई-४०० ०२७.
**विरुद्ध**
**जन माहिती अधिकारी परिमंडळ-६**
सह आयुक्त (बृहन्मुंबई) यांचे कार्यालय,
अन्न व औषध प्रशासन, म.राज्य ३४१,
वांद्रे-कुर्ला संकुल,३रा मजला, वांद्रे (पूर्व) मुंबई – ४०००५१.
**प्रथम अपीलीय अधिकारी**
सह आयुक्त (बृहन्मुंबई) यांचे कार्यालय,
अन्न व औषध प्रशासन, म.राज्य ३४१,
वांद्रे-कुर्ला संकुल,३रा मजला, वांद्रे (पूर्व) मुंबई – ४०००५१.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १७.१२.२०२४**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित. ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे नोटीस दि. २६.११.२०२४ रोजी प्राप्त. |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपीलीय अधिकारी | : | उपस्थित |

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| १३.०१.२०२० | १२.०२.२०२०/२३.१२.२०२० | १४.०२.२०२० | ११.१२.२०२० |

अपिलकर्तांनी जन माहिती अधिकारी यांचे दि. १२.०२.२०२० व २३.१२.२०२० रोजीचे उत्तर आणि प्रथम अपिलीय अधिकारी यांचे दि.११.१२.२०२० रोजीचे आदेश संलग्न करुन दि.०९-०२-२०२१ रोजी आयोगाकडे द्वितीय अपिल दाखल केले आहे.

अपिलकर्तांनी माहिती अर्ज दि.१३.०१.२०२० अन्वये दि.१६.१०.२०१९ रोजीच्या लिगल नोटीसची कार्यवाही व तपशील संदर्भात माहितीची मागणी केलेली आहे.

जन माहिती अधिकारींनी दि. १२.०२.२०२० रोजी अपिलकर्तांना उत्तर देण्यात आले आहे.

जन माहिती अधिकारींनी माहिती अपूर्ण दिल्याने दि.१४.०२.२०२० रोजी प्रथम अपिल दाखल केले.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त (बृहन्मुंबई) परि-३ अन्न व औषध प्रशासन यांनी दि. ०४.११.२०२० रोजी सुनावणी घेऊन अपील मान्य करुन १० दिवसांत नि:शुल्क माहिती देण्याचे

आदेशीत केले. जन माहिती अधिकारी यांनी पत्र दि. २३.१२.२०२० अन्वये १५० पृष्ठांची माहिती अपीलार्थीस पुरविण्यात आली आहे.

अपिलकर्ता यांनी आयोगाकडे दि.०९.०२.२०२१ रोजी अपूरी माहिती मिळाली असे कारण नमूद करुन द्वितीय अपिल दाखल केले आहे.

आजच्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांना नोटीस प्राप्त झाली असून कोणतीही पूर्वसूचना न देता अनुपस्थित आहे. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त (औषधे) बृहन्मुंबई विभाग श्री. एल.डी. पिंटो व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा सह आयुक्त, (औषधे) बृहन्मुंबई विभाग, श्री. वि.ता. जाधव उपस्थित आहेत.

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त (औषधे) बृहन्मुंबई विभाग श्री. एल.डी. पिंटो यांनी आयोगास दि. १६.१२.२०२४ रोजी लेखी निवेदन सादर केले की, प्रथम अपील आदेशानंतर दि. २३.१२.२०२० रोजीच्या पत्रान्वये अपीलार्थीस माहिती पाठविण्यात आले आहे.

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त (औषधे) बृहन्मुंबई विभाग श्री. एल.डी. पिंटो यांनी आयोगासमोर अपीलार्थी यांना माहिती पाठविल्याची पावती सादर केली आहे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त (औषधे) बृहन्मुंबई विभाग यांनी अपीलार्थी यांना माहिती दिलेली आहे.

सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**१. वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**

**२. अपिल निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Maharashtra

प्रदीप व्यास
17-12-2024

**( डॉ. प्रदीप व्यास )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**मुंबई**
**दिनांक : १७.१२.२०२४**